## : प्रास्ताविक :

" रामचंद्र पंताची मराठी राज्य रचनेतील भूमिका-कार्य "

" इ.स. १६५० ते १७१६ "

" THE ROLE OF RAMCHANDRA PANT IN THE BUILDING OF THE MARATHA STATE 1650 A.D. TO 1716 A.D." हा शोध प्रबंध मी एम्. फिल. डिग्रीसाठी सादर करीत आहे. हा प्रबंध मराठीमध्ये लिहिण्याची शिवाजी विद्यापीठाने मला परवानगी दिल्याने मी प्रथमतः विद्यापीठाचे आभार मानतो. आणि हा प्रबंध सादर करण्यापाठीमागचा हेतू तथा या प्रबंधाची मराठा इतिहासातील गरज अल्पशः प्रस्ताविकामध्ये पुढीलप्रमाणे सादर करतो.

महाराष्ट्र आणि मराठयांचा इतिहास, या दोन गोष्टी आता एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मराठयांचा इतिहास, महाराष्ट्रामध्ये केवळ इतिहास शिकविण्यामुळेच नव्हे, तर मराठी साहित्यामुळेही सामान्य माणसापर्यन्त पोहोचला आहे. तथापि या सर्व लेखनांमध्ये मराठा राज्य निर्मिती आणि रचना तथा संवर्धन आणि संरक्षण करणा-या अनेक कर्तबगार व मातब्बर अशा मराठयांच्यातील अनेक कर्त्या पुरुषांच्यावर स्वतंत्रपणे आणि संशोधनात्मक पध्दतीने फारसे कोणी लेखन केलेले नाही. अशा मातब्बर ज्या व्यक्ती होत्या त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील - रामचंद्र पंत अमात्य, हे एक होत.

रामचंद्र पंतानी केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातच कार्य केले असे नव्हे, तर शिवाजी महाराजांच्या नंतर त्यांचे मुलगे आणि नातू यांच्याही काळात महत्वाची भूमिका केलेली आहे. छत्रपती शिवाजी,

छत्रपती संभाजी आणि छत्रपती राजाराम, या तिघांच्या काळामध्ये आणि त्यानंतरही, इ. स. १७00 ते १७0७ पर्यन्त मराठयांना नेस्तनाबुत करण्यासाठी आलेल्या औरंगजेबाविरुध्दच्या लढ्यातही फार मोठी कामगिरी बजावली होती. त्यानंतर कोल्हापूरचे राज्य स्थापन करण्यात व कोल्हापूर छत्रपती शिवाजी व संभाजी यांना मार्गदर्शन करण्याचे "हुकुमतपन्हा" या नात्याने त्यांनी अत्यंत महत्वाचे काम केले होते. अशा या रामचंद्र पन्ताच्या जीवन कार्यावर स्वतंत्रपणे व ग्रंथरुपाने कोणी लेखन केलेले नव्हते.

इ. स. १९१६ मध्ये रा. म. गोरे यांनी एक ग्रंथ लिहून रामचंद्र पंत व त्याची बावडा येथील जहागीर तथा त्याच्या वारसांची माहिती देणारा ग्रंथ लिहीलेला आहे. या ग्रंथाखेरीज मराठीच नव्हे तर अन्य भाषांमध्येही रामचंद्रपंतावर स्वतंत्र ग्रंथ लिहीलेला नाही.

एम्. फिल्ला प्रवेश घेतल्यानंतर अशा या रामचंद्रपंतावर शोध प्रबंध लिहून एम्. फिल्. अभ्यासक्रमाची पूर्तता करण्याचा माझा हेतू होता. पण या विषयाच्या संदर्भात आवश्यक ती साधनसामुग्री, कागदपत्रे व संदर्भग्रंथ कसे आणि कोठे मिळवायाचे आणि शोध प्रबंध कसा लिहावयाचा, अशी इतरांच्याप्रमाणे मलाही अडचण होती. परंतु शोध प्रबंधाचे मोघम नाव मी माझे मार्गदर्शक डॉ. एम. डी. नलावडे यांना सांगताच त्यांनी ते मान्य केले, आणि प्रोत्साहन दिले. किंबहुना याच विषयावर शोध प्रबंध लिहीण्याचे सांगितले. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयासाठी आवश्यक असलेली माहिती मिळवायला मी प्रारंभ केला. परंतु सुसंबंध व आवश्यक अशी माहिती मिळत नव्हती. काही वेळा निराशाही आली. कारण रामचंद्रपंताच्यावर स्वतंत्रपणे

एकही ग्रंथ उपलब्ध नाही. आणि जी काही साधनसामुग्री आहे, ती अत्यंत विस्कळीत, असंबंध आणि पृथकपणे विखुरलेली आहे. त्यामुळे ही सर्व माहिती मिळविली तरी ५०-६० पानांच्यापेक्षा रामचंद्र - पंतावर जास्त लेखन करता येणार नाही, असे वाटत होते.

तथापि माझे मार्गदर्शक यांनी योग्य मार्गदर्शन व उत्तेजन देऊन मी संकलीत केलेली माहिती व टिपणे पाहून त्यामध्ये उपयुक्त भर पडेल अशी त्यांनीही माहिती आणि संदर्भ मिळवून दिले. त्यामुळे सदरचा प्रबंध मूर्त स्वरूपात येऊ शकला.

या प्रबंधामध्ये एकूण आठ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात रामचंद्रपंताच्या पूर्वजांचा शोध घेऊन या घराण्याची वाटचाल शिवाजी महाराजांच्या काळापर्यन्त कशी झाली, हे साधार दाखविले आहे. पुढे रामचंद्र पंत शिवाजीच्या काळात प्रथम सबनीस, नंतर अमात्य, झाल्याचे दाखवले आहे. नंतर संभाजीच्या काळापासून राजारामाच्या अखेर पर्यंत आणि त्यानंतर कोल्हापूर राज्य स्थापन झाल्यावर त्यांनी शेवटच्या काळीही "हुकुमतपन्हा" हा कार्यभार कसा सांभाळला होता याचा - आलेख दिलेला आहे.

प्रकरण दोन मध्ये रामचंद्र पंतानी मराठा राज्य संस्थापक - शिवाजी व त्यांच्यानंतर छत्रपती झालेले त्यांचे पुत्र संभाजी यांच्या कारकिर्दीत जी कामगिरी केलेली आहे, ती ससंदर्भ निवेदन केलेली आहे.

प्रकरण तीन आणि चार म्हणजे छत्रपती संभाजीच्या वधानंतर मराठयांच्यावर गुदरलेल्या अपूर्व संकटाच्यावेळी, म्हणजे ज्यावेळी औरंगजेबाने मराठयांना सर्व बाजुनी कोंडीत पकडले होते, त्यावेळी रामचंद्र पंतानी - समर्थपणे मराठा राज्य वाचविण्यासाठी, जे उदंड कार्य केले त्याचा आढावा देण्यात आलेला आहे. त्यामध्ये राजारामाचे संरक्षण, त्याला जिंजाला

.... ४/-

पाठवणे, जिंजिहून परत आणणे तसेच त्याचा कबिलाही जिंजीला पाठवून परत आणणे, या कार्यांबरोबर औरंगजेबाविरुध्द लढण्यासाठी मराठ्यांना सतत प्रेरणा आणि प्रोत्साहन देणे, हे पंतानी कसे शक्य केले, त्याचा वृतांत साधार दिला आहे.

पाचव्या प्रकरणात राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर - महाराष्ट्रामध्ये छत्रपतीच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला होता. आणि त्याचवेळी राजाराम मरण पावल्याने मराठ्यांचे राज्य बुडविण्यासाठी औरंगजेबाने निकराचे प्रयत्न सुरु केले होते. हा काळ सुध्दा कठीण होता. त्याकाळात मराठे दुभंगले असते, तर औरंगजेबाला विजय मिळाला असता. पण रामचंद्रपंतानी ते शक्य होऊ दिले नाही, वगैरेसंबंधी पुराव्यांच्या आधारे माहिती दिली आहे.

प्रकरण सहामध्ये औरंगजेब मरण पावल्यानंतर मोगलांनी - दिल्लीकडे जाताना त्यांच्या कैदेतील शाहूला मुक्त करुन मराठ्यांच्यात विभाजन करण्याचा डाव टाकला होता. शाहूच्या आगमनानंतर - महाराष्ट्रात दोन छत्रपती निर्माण झाले. कारण शाहूच्या गैरहजेरीत राजारामाच्या मृत्युनंतर त्याची बायको ताराबाई, ही आपला मुलगा शिवाजी याचा राज्याभिषेक करुन मराठ्यांचे राज्य चालवित होती. शाहूने त्या राज्यावर अधिकार सांगितला. त्यामुळे मराठा सरदार दुभंगले गेले. रामचंद्र पंत मात्र ताराबाईच्या पक्षातच राहिले. तिला कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य निर्माण करायला त्यांनी सहकार्य केले. पण पुढे ती अरेरावीने वागू लागताच तिच्याविरुध्द त्यांनी रक्तहीन राज्यक्रांती घडवून आणली आणि तिचा मुलगा शिवाजी याला गादीवरुन काढून टाकून तिचा सावत्र मुलगा संभाजी याला गादीवर बसविले. या - संभाजीचे काळात "हुकुमतपन्हा" या नात्याने त्यांनी सर्व राज्य सांभाळले.

... ५/-

पोर्तुगीजांच्या बरोबरसुध्दा सलोखा केला आणि कारभार पहात असतानाच वृध्दपकाळी त्यांचा अंत झाला. ही सर्व माहिती पुराव्यानिशी देण्यात आलेली आहे.

सातव्या प्रकरणात रामचंद पन्ताचा मृत्यु निश्चितपणे केव्हा झाला, हे साधार दाखविलेले आहे. त्यानंतर त्यांना मिळालेली वतने व इनामे तसेच, त्यांच्या वारसदारांचीही माहिती दिलेली आहे. शेवटी अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व मराठ्यांच्या राजनीती संबंधाने कोल्हापूरचे संभाजी यांना ज्याव्दारे मार्गदर्शन केले त्या "आज्ञापत्र" याग्रंथाचे महत्त्व विशद केलेले आहे.

"आज्ञापत्र" या ग्रंथातील प्रकरणे व राजनीती विषयक - सुत्रबध्द माहिती कशी आहे, त्या माहितीचे महत्त्व काय आहे, आणि तिच्या विषयी इतिहासकारांची विविध मते कशी आहेत, या सर्वांचा आढावा घेण्यात आलेला आहे. आणि शेवटच्या आठव्या प्रकरणात रामचंद्रपंताच्या एकूण ४८ वर्षांच्या कारकीर्दीचे महत्त्व विशद करुन इतिहासकारांनी त्यांच्याविषयी जे निष्कर्ष काढलेले आहेत, ते दिलेले आहेत.

सदर प्रबंधासाठी मला माझे मार्गदर्शक डॉ. एम. डी. नलावडे यांचे बहुमोल मार्गदर्शन झालेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय - माझ्याच्याने हे काम होणे अशक्य होते. तसेच हा प्रबंध मराठीमध्ये लिहिण्यासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी. आर. कांबळे आणि विभागातील सर्वच प्राध्यापकांनी सहानुभूतीपूर्वक विचार करुन मला मराठीत प्रबंध लिहिण्यासाठी परवानगी मिळवून दिली. मी पी. व्ही. पी. महाविद्यालय, कवठेमहांकाळ, येथे गेली ८ वर्षे सिनिअर कॉलेजमध्ये इतिहास

...६/-

अध्यापनाचे कार्य. करीत आहे. सुदैवाने या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.-एम.ए.पवार हे इतिहास विषयाचेच आहेत. मी एम्.फिल्.करावे, अशी त्यांचीही फार इच्छा होती. त्यासाठी त्यांनी मला प्रोत्साहन दिले. तसेच माझ्या महाविद्यालयातील माझे सहकारी श्री.कचरे एल.बी., - वाघमोडे एस.टी., भैरट बी.पी., मुलाणी एम.एम., भोसले ए.एन., भोसले जे.वाय्., पाटील एच.बी. यांनीही मला नेहमीच प्रोत्साहन दिलेले आहे.

या सर्वांबरोबरच मला ज्यांची मदत झालेली आहे त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील सेवक वर्ग, कोल्हापूर येथील शासकीय दप्तरखान्यातील सेवक वर्ग, पन्हाळा येथील वयोवृध्द इतिहास संशोधक गुळवणी गुरुजी या सर्वांचा मी त्यांनी मला दिलेल्या - प्रोत्साहनाबद्दल व सहकार्याबद्दल फार आभारी आहे.

(शेषराव यशवंत शिरसाठ)

.......

## पंत आमात्य बावडेकर यांची वंशावळ

- नारोपंत (भादाणे,कुक्षा वगैरे गावचे वतीन कुलकर्ण कल्याण)
  - निळोपंत (बेदरास बादशहाने कयालनिशी नेमले, सातवेळची ठाणेदारी)
    - कृष्णराव
      - नारोपंत (मालोजीराजे भोसले यांचे आश्रयास)
        - सोनोपंत (शहाजी यांचे आश्रयास, डबीर, शिवजन्माचे वेळी शिवनेरीस)
          - निळोपंत शिवाजी महाराजाचे डबीर,सचीव,मुजुमदार
            - नारोपंत
            - रामचंद्र पंत अमात्य,हुकूमतपन्हा
              - भगवंतराव (१७२० ते १७५०)
                - कृष्णराव (१७५० ते १७६१)
                  - सुबराव (द.) (१७६१ ते १८१०)
                    - रामचंद्र (द.) (१८११ ते १८१३)
                    - मोरेश्वर (द.) (१८१३ ते १८२६)
                      - गोविंदराव (१८२६ ते १८३४)
                      - शंकरराव
              - शिवराम
              - मोरेश्वर
          - आबाजी (कल्याणचा सुभेदार)

रघुनाथराव (द.) (१८३५ ते १८४५)
|
रामराव (द.) (१८४७ ते १८४९)
|
मोरेश्वरराव (द.) (१८५० ते १९२३)
|
परशुराम उर्फ भाऊसाहेब (१९०७ ते १९४२)
|
रामचंद्र उर्फ भय्यासाहेब (द.)

माधवराव (ज.१९६२) | निळकंठराव (ज. १९६८)

---

"करवीर सरदाराच्या कैफियती" या खंडेराव आनंदराव गायकवाड यांनी संपादित केलेल्या ग्रंथांत, या घराण्याचा मुळ पुरुष म्हणून नारोपंत दाखविलेला आहे. परंतु त्याचा बंधू काळोपंत याचा उल्लेख केलेला नाही. हा उल्लेख रा.म.गोरे लिखित "पंत अमात्य संस्थान बावडा यांचे वंशावृत्त" या इ.स. १९१६ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांत आहे. पहा पु.

## ABBREVIATION

### सांक्षिप्त रुपे

सदरच्या प्रबंधामध्ये तळटीपांच्या सोयीसाठी लेखक व त्यांचे ग्रंथ या बाबतीत पुढील प्रमाणे संक्षिप्त रुपे वापरली आहेत. आणि ग्रंथ इंग्रजीत असेल तर इंग्रजीतील संक्षिप्त रुप ABBREVIATION वापरले आहे.

तसेच जे ग्रंथ दोन किंवा दोहोपेक्षा जास्त लेखकांनी वा विव्दानांनी संपादित केलेले आहेत, त्यांच्या बाबतील त्यांच्या उपनामांचा वापर करुन संक्षिप्त रुप केले आहे. तर संक्षिप्त रुपे अशी –

| | | |
|---|---|---|
| १. | खरे-भिडेआ | : खरे, ग. ह., व भिडे, श्री. र., संपा. आज्ञापत्र. |
| २. | ढेरे-जोशीआ | : ढेरे, रा.चिं., व जोशी प्र.पं., संपा. आज्ञापत्र. |
| ३. | पसेतुमऔ | : पगडी, सेतुमाधवराव., संपा. मराठे व औरंगजेब. |
| ४. | पसेतुमोम | : पगडी, सेतुमाधवराव, संपा. मोगल आणि मराठे(भिमसेन सक्सेनाकृत तारीखे दिल्कुशा) |
| ५. | पसेतुमोमसं | : पगडी, सेतुमाधवराव., संपा. मोगल-मराठा संघर्ष. |
| ६. | पसेतुहिंस्वमो | : पगडी, सेतुमाधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल. |
| ७. | बेंद्रेराजा चरितम | : बेंद्रे, वा.सी., संपा. राजाराम चरितम् अथवा जिंजीचा प्रवास. |

| | | |
|---|---|---|
| ८. | बेंद्रे राजाराम | : बेंद्रे वा.सी., श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन "हिंदवी स्वराज्याचा" मोगलांशी झगडा. |
| ९. | बेंद्रे संभाजी | : बेंद्रे वा.सी., श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र. |
| १०. | सगोसअमअ | : सरदेसाई, गो.स., अव्वल मराठाशाहीचे अंत:स्वरुप. |
| ११. | सगोसमरी | : सरदेसाई, गो.स., [illegible] मराठी रियासत; |
| १२. | सगोस राजाराम | : सरदेसाई, गो.स., स्थिरबुध्दि राजाराम. |
| १३. | सगोसशाबा | : सरदेसाई, गो.स., हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास मराठी रियासत ५, पुण्यश्लोक शाहु, पेशवा बाळाजी विश्वनाथ. |
| १४ | SGSNHM | : Sardesai, G.S. New History of the Marathas. |
| १५. | SJNAUB | : Sarkar, J. N., History of Aurangzib. |
| १६. | SJNSJ | : Sarkar, J. N., House of Shivaji. |